# कल्याण गायन समाज

# दिनकर संगीत विद्यालय व म्हैसकर कला अध्यासन

# यांच्या सहयोगाने आयोजित

# शास्त्रिय गायन स्पर्धा २०२४-२०२५

## - नियम व अटी -

१. ही स्पर्धा १६ ते ४० वर्ष वयोगटातील स्त्री-पुरुषांकरिता खुली राहील.

२. स्पर्धेसाठी प्रवेश मर्यादित आहे.

३. आकाशवाणीवर नियमित गाणाऱ्या व व्यावसायिक गायकांना या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

४. या स्पर्धेकरिता प्रवेश शुल्क रु. १००/- निर्धारित करण्यात आले आहे.

५. स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकाचे आपल्या गुरूकडे अथवा संगीत विद्यालयात किमान ५ वर्षे शिक्षण झालेले असावे.

६. एखाद्या स्पर्धकाचे सादरीकरण स्पर्धेच्या दर्जाला साजेसे नसल्यास त्यांना मध्येच थांबविण्याचा पूर्ण अधिकार सन्माननीय परिक्षकांना देण्यात आलेला आहे.

७. परिक्षकांनी दिलेला निकाल हा स्पर्धकांना बंधनकारक असेल.

८. प्रवेश अर्ज देण्याची अंतीम तारिख दि. ३१ डिसेंबर २०२४ आहे.

९. आवेदन पत्र अपूर्ण भरल्यास स्विकारले जाणार नाही.

१०. कोणताही अर्ज स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार स्पर्धा समितीस राहील.

११. स्पर्धेला किमान १५ स्पर्धकांचे अर्ज आले तरच स्पर्धा होईल.

१२. स्पर्धकांनी दिलेल्या वेळेच्या आगोदर अर्धा तास उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

१३. स्पर्धकांना कोणत्याही प्रकारचा प्रवास व इतर खर्च दिला जाणार नाही.

१४. शास्त्रीय गायनाच्या स्पर्धकांनी सादरीकरणासाठी निवडलेल्या ६ रागांपैकी ( सर्व प्रहरातील रागांची निवड अपेक्षित आहे) स्वतःच्या पसंतीचा

एक राग विलंबित व द्रुत बंदिशिसह १५ मिनिटे गावा लागेल. उरलेल्या ५ रागांपैकी परीक्षक आयत्या वेळी सांगतील तो राग ५ मिनिटे गावा लागेल.

१५. संस्थेतर्फे स्पर्धकाला तबला व हार्मोनियम साथिदार उपलब्ध करून देण्यात येतील, स्वतःचे साथीदार आणल्यास त्यांची साथ गाण्याला पूरक असावी सूचक नसावी.

१६. स्पर्धकांना स्वरमंडल घेता येणार नाही (इलेक्टॉनिक तानपुरा वापरता येईल).

१७. स्पर्धेसंदर्भात कोणतेही बदल करण्याचा हक्क स्पर्धा संयोजन समिति स्वतःकडे राखून ठेवत आहे.

१८. स्पर्धेचे प्रवेश अर्ज कल्याण गायन समाजाच्या खालील साईटवर उपलब्ध आहेत.

www.kalyangayansamaj.com

स्पर्धेची तारीख :- शनिवार १८ व रविवार १९ जानेवारी २०२५

पारितोषिके :-

प्रथम क्रमांक रु. १००००/-
द्वितीय क्रमांक रु. ६०००/-
तृतीय क्रमांक रु. ४०००/-
उत्तेजनार्थ रु. १०००/-

संस्थेचा पत्ता :-

कल्याण गायन समाज
टिळक चौक,
कल्याण पश्चिम

अधिक माहितीकरिता संपर्क क्रमांक :-

श्री. दिपक घारपुरे ९९८७५९१०४७
श्री. कौस्तुभ आपटे ८१४९९८१९६९
श्री. सारंग जोशी ९८२०१००९७९